महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-८ अंक-१ जानेवारी ते मार्च -२०१४

**प्रिय कर्मचारी बंधु आणि भगिनींनो,**

नविन वित्तीय वर्ष २०१४-२०१५ सुरु झालेले आहे. हया नवीन वर्षातही महापारेषण कंपनी अधिक चांगली कामगिरी करेल असा मला विश्वास आहे.

चांगल्या कामगिरीकरीता कामाचे नियोजन हा मुलभुत घटक आहे. उत्तम नियोजनाच्या आधारावर आपण आपले लक्ष प्राप्त करू शकतो.

आपल्या अभियांत्रिकी कार्यामध्ये संचलन व सुव्यवस्था तसेच प्रकल्प हे दोन मुख्य घटक आहेत. आपली चांगली कामगिरी या दोन घटकांवर केलेल्या प्रयत्नाचे फलस्वरूप असते. संचलन व सुव्यवस्था मध्ये वेळोवेळी आढावा घेऊन त्यामध्ये नियमितता आणण्यामध्ये कंपनीने यश मिळविले आहे.

आपली राज्य पारेषण उपक्रम विभाग (STU) नियोजनात्मक कार्य विविध केंद्रीय व तत्सम संस्थेच्या समन्वयाने पार पाडीत असते. त्या सर्व बाबींचा अभ्यास करून प्रकल्पासंबंधीत लक्षें (Targets) प्रकल्प विभागाशी समन्वयाने ठरवीत असतात.

मागील वर्षांचा कल लक्षात घेता वर्षाकाठी कंपनीला २५ उपकेंद्रे व १५०० CKM लाईन्सचे लक्ष गाठायचे असते. यामध्ये अंदाजे २,५०० कोटी भांडवली खर्च लागतो. एवढया मोठ्या प्रमाणावरचा खर्च आपण अंदाजे ८०% ऋण आणि २०% भाग भांडवलातून भागवत असतो. अर्थातच घेतलेल्या ऋणावर आपल्याला व्याज दयावे लागते, मात्र २०% स्वत:चे भाग भांडवल आपल्याला नफा मिळवून देवू शकते. मात्र त्याकरीता आपल्याला भांडवली खर्च (Cap. Ex.) भांडवलात (Capitalised) रुपांतरित करणे जरूरीचे आहे.

भांडवली खर्चाचे रूपांतर भांडवलात (Assets) नियोजित वेळेत व खर्चात करण्याचे आव्हान आपण पार पाडू शकलो तर आपली आर्थिक परिस्थिती चांगली होण्यास मदत होईल त्याकरीता लक्षित करून दिलेले उपकेंद्राचे निर्माण व पारेषण वाहीन्यांची काम पूर्ण करून त्याचा वापर (Commissioning) सुरु होणे गरजेचे आहे. ज्यावेळी हे Assets Commissioning होतील त्यावेळे पासुन आपल्याला Revenue मिळण्यास सुरुवात होते.

अशा प्रकारे प्रकल्पाचे लक्ष वेळेत पूर्ण केल्यास त्याचे आर्थिक परिणाम चांगले येतील तसेच त्याबरोबर विद्युत गुणवत्ता (Power Quality) वाढण्यास फार मोठी मदत ठरते Upstream आणि Downstream Facilities सोबत समन्वय साधुन Reliability Factor वाढतो. त्यामुळे Interruptions कमी होऊन Availability मध्ये वाढ होते. System Constraints कमी होतात Customer Orientation Level वाढते तसेच Power Wheeling च्या प्रमाणात वाढ होते. एकंदरीत आपले Revenue स्त्रोत वाढीस लागतात.

प्रकल्प व्यवस्थापना मध्ये प्रकल्प समन्वय (Co-ordination) नियमीत अवलोकन (Review & Monitoring) साधनांची उपलब्धता (Resources Mobilisation) हे तीन प्रमुख घटक आहेत. त्याचबरोबर हे करीत असताना Quality, Time आणि Cost यांच्यावर नियंत्रण ठेवणे या त्यामधील अतिशय महत्वाच्या बाबी आहेत.

समन्वय ही एक कला आहे. सर्व समाविक, निगडीत संस्थे बरोबर अंतर्गत तसेच बाहय, या बरोबर समन्वय साधता आला पाहिजे. त्याकरीता Proactive Approach, Communication, Rapport Building, Follow-up, Doing Proper Home Work, Out of Box Thinking, Creativity / Innovation हया घटकांना फार मोठी संधी आहे.



अभ्यास, तयारी, चिकाटी Statesmanship च्या आधारे आपण जागे किंवा RoW संबंधात परवाने (Clearances) मिळवून घेऊ शकतो.

या संदर्भात Continuous Dialogue ठेवुन Solution Oriented राहणे गरजेचे आहे. तसेच Point of Escalation निर्देशीत करणे हे तितकेच महत्वाचे आहे. वेळीच Matter Escalate करण्याची प्रणाली आपल्या System मध्ये असेल तर त्याचा चांगला फायदा होऊ शकतो.

PWD, Forest, Gram Panchayat, Muncipality, Revenue Dept., Collector Office अशा प्रकारे Multy Agency Approach ने कामे करणे गरजेचे असते. तसेच अंतर्गत विभाग Civil, Construction, Electrical, STU, F&A व HR (Man Power) यांच्याशीही समन्वय साधने गरजेचे राहते. कंत्राटी कंपनीशी संपर्कात राहुन त्यांच्याकडून ठरलेली कामे ठरलेल्या वेळात करणे गरजेचे आहे. त्यांचा कामानुरुप ठरविलेला निधी उपलब्ध करून देणे तेवढेच गरजेचे असते अन्यथा ते कामावरून त्यांचे लक्ष कमी करू शकतात. Cash Flow, Man Power हे पाहणे तितकेच गरजेचे ठरते.

असे दिसते की विशेषत: जानेवारी ते मे महिन्यामध्ये प्रकल्पाची कामे वाढीस लागतात व इतर महिन्यामध्ये ती संथगतीने होतात. या अवस्थेस "Student Syndrom" म्हणतात म्हणजे वर्षाच्या शेवटी परीक्षेच्या तयारीला लागणे. संपूर्ण वर्षाचे नियोजनानुसार कामगिरी केली तर चांगले परिणाम दिसु शकतात. कामाची घाई होणार नाही. Quality Compromise करावी लागणार नाही. Time Overrun व त्यामुळे Cost Overrun होणार नाही. याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे आपले Assets वेळेत Captalised होवून त्याच्या पासुन Revenue Generate होण्यास सुरुवात होईल.

मी आशा करतो महापारेषण चे अभियंते, अधिकारी व कर्मचारी नविन वर्षाचे लक्ष गाठण्यास मला सहकार्य करतील.

**शुभेच्छा सह!!**

**बिपीन श्रीमाळी**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

## ERP Plant Maintenance Module ची वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न



महापारेषण कंपनीमधील O & M, TCC आणि Load Dispatch विंगमध्ये कार्यरत असणाऱ्या तब्बल १३० कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंत्यांसाठी खास आयोजित केलेली ERP Plant Maintenance Module ची दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा जानेवारी आणि फेब्रुवारी २०१४ मध्ये संपन्न झाली. महापारेषण कंपनीतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात घेण्यात आलेली आणि संपूर्ण In-House तसेच Hands-on Practice चा समावेश असे या कार्यशाळेचे स्वरूप होते.

नाशिक आणि वाशी परिमंडळातील अधिकाऱ्यांसाठी RTC पडघे येथे २८ व २९ जानेवारी २०१४ रोजी, नागपुर परिमंडळ व RTC अंबाझरी येथे कार्यरत अधिकाऱ्यांसाठी १४ व १५ फेब्रुवारी २०१४ रोजी अंबाझरी येथे, पुणे आणि कराड परिमंडळातील अधिकाऱ्यांसाठी RTC कोल्हापुर येथे २१ व २२ फेब्रुवारी २०१४ रोजी, तसेच औरंगाबाद आणि अमरावती परिमंडळातील अधिकाऱ्यांसाठी RTC औरंगाबाद येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च २०१४ रोजी सदर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

श्री.संजय शिंदे, मुख्य अभियंता (मासंवि) व श्री.सुनिल सुर्यवंशी, अधीक्षक अभियंता (ERP) यांच्या मार्गदर्शनाखाली सांघिक कार्यालयातील ERP Plant Maintenance Core Team Lead श्री.विशाल वाघचौरे व त्यांच्या चमूने या कार्यशाळेचे आयोजन केले होते. ERP Plant Maintenance Module चे झोनल चँपीयन म्हणून कार्यरत असलेले अमरावती परिमंडळाचे श्री.सचिन आसरकर, औरंगाबाद परिमंडळाचे श्री.आनंद घोरपडे, कराड परिमंडळाचे श्री.दत्तात्रय पाटील, नागपूर परिमंडळाचे श्री.प्रशांत खटी, नाशिक परिमंडळाचे श्री.अनिल थेटे, पुणे परिमंडळाचे श्री.नंदकिशोर ढाकणे व वाशी परिमंडळाचे श्री.राहूल भट यांच्या सोबत सांघिक कार्यालयात ERP Plant Maintenance Core Team मध्ये कार्यरत श्रीमती रिटा राजलवार आणि श्रीमती टिना सुर्वे यांनी प्रशिक्षक म्हणून ही कार्यशाळा यशस्वीरित्या पूर्ण करण्यात मोलाची मदत केली.

सदर कार्यक्रमासाठी कार्यकारी संचालक (संचलन) मा.श्री.सुभाष केळकर, मुख्य अभियंता (मासंवि) मा.श्री.संजय शिंदे तसेच मुख्य अभियंता (संवसु) मा.श्री.जयंत विके यांची वेळोवेळी उपस्थिती लाभली. प्रशिक्षणाच्या विविध अभिनव पहेलूंचा उपयोग करून प्रशिक्षणार्थींना खिळवून ठेवणारे तसेच दैनंदिन कार्यालयीन कामकाजामध्ये अत्यंत उपयुक्त असे हे प्रशिक्षण असल्याचा Feedback सर्व प्रशिक्षणार्थींकडून आयोजकांस मिळाला आहे.

## १ ३ २ केव्ही उपकेंद्र धारणी जि.अमरावती येथील भुमिपूजन समारंभ




महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित अउदा बांधकाम नि.संवसु परिमंडळ अमरावती अंतर्गत १३२केव्ही उपकेंद्र धारणी जि.अमरावती चा भुमिपूजन समारंभ दिनांक २२ फेब्रुवारी २०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.ना.श्री.राजेंद्रजी मुळक, राज्यमंत्री वित्त, नियोजन व ऊर्जा महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली मा.श्री.केवलराजी काळे आमदार धारणी यांचे व इतर मान्यवरांचे विशेष उपस्थितीत मौजा जुटपाणी येथे संपन्न झाला.

धारणी परिसरात नेहमीच कमी दाबाचा व खंडीत विद्युत पुरवठा मिळत असतो. हया बाबीची दखल घेऊन महावितरण कंपनीने महापारेषण कंपनीला १३२केव्ही उपकेंद्र स्थापित करण्यात यावे असा प्रस्ताव सादर केला होता व त्याची दखल घेऊन महापारेषण कंपनीने ठराव क्र. ६५/१७ दि. १२.०८.२०११ अन्वये १३२ केव्ही उपकेद्र धारणी येथे स्थापन करण्याचा ठराव मंजूर केला. सदर नियोजीत उपकेंद्राचा अंदाजीत खर्च ३४ कोटी रु. असून त्यांत २५ एमव्हीए क्षमतेचे २ रोहीत्र, ५५ किमी लांबीची १३२ केव्ही वीजवाहिनी मध्यप्रदेशातील नेपानगर येथून टाकण्यात येणार असून ३३ केव्ही चे ६ आऊटलेट राहणार आहेत.

हे प्रस्तावित उपकेंद्र कार्यान्वित झाल्यानंतर सद्यपरिस्थितीत धारणी परिसरात कमी विद्युत दाबामुळे शेती पंपाना व घरगुती विज ग्राहकांना तसेच औद्योगिक क्षेत्राला होणारा त्रास कमी होण्यास मदत होईल. नविन विद्युत-भार जोडता येईल व विद्युत हानी कमी होईल. सदर कार्यक्रमास परिसरातील अंदाजे २५००० नागरीकांनी हजेरी लावली. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री.भाऊराव राऊत, अधीक्षक अभियंते श्री.वासुदेव खाडे, वंदनकुमार मेंढे, दिलीप घुगल, कार्यकारी अभियंते प्रफुल्ल औघड, सुरेश पाठक, सुनिल शेरेकर, अशोक सावदे, रुपेश फरकाडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता दिनेश धुमाळे, देवेन्द्र ढोरे, जयंत वाघमारे, रुपेश काळे तानाजी वाघमारे, सुशांत तायडे, मंगेश धारपवार, लेवरकर यांनी अथक परिश्रम घेतले.

## केरळ विद्युत मंडळ आयोजित ३९वी अखिल भारतीय विद्युत क्रिडा नियंत्रण मंडळ बास्केटबॉल क्रिडा स्पर्धेत, तिरुअनंतपुरम, केरळ येथे महापारेषण कंपनीचा सहभाग




**पहिल्या रांगेत (डावीकडून)-** अरुण बेळगावकर, कोच (कराड), स्मिथ पुनवतकर (औरंगाबाद), सुयोग भुते (पुणे), विलास कोल्हे (औरंगाबाद), कुमरे (नागपुर), धीरज उकेंडे (पुणे), अशोक साळुंखे, संघ व्यवस्थापक (मुंबई).
**दुसऱ्या रांगेत (डावीकडून)-** सशांक देवरे (नाशिक), मिलिंद पदमेकर (अमरावती), सागर गुजराती (पुणे), विल्सन अचनकुंजु, संघ नायक (औरंगाबाद), धीरज मिंदुले (अमरावती), अतुल भिसे (अमरावती)

केरळ विद्युत मंडळ यांचे यजमानपदाखाली ''३९वी अखिल भारतीय विद्युत क्रिडा नियंत्रण मंडळ बास्केटबॉल क्रिडा स्पर्धेत'' तिरुअनंतपुरम, केरळ येथे उत्साहाने व निसर्गरम्य वातावरणात संपन्न झाल्या.

या क्रिडा स्पर्धेचे उद्घाटन दि. २६.०३.२०१४ रोजी सायंकाळी ४.०० वा.मा. ऊर्जामंत्री, केरळ राज्य यांच्या हस्ते पार पडले. सदर क्रिडा स्पर्धेत महापारेषण कंपनीने या क्रिडा प्रकारात कंपनी करणानंतर दुसऱ्यांदा सहभाग नोंदविला आहे.

या स्पर्धेत महापारेषण कंपनीने एकुण ४ संघासोबत सामने खेळले असुन त्यापैकी १ सामान्यात महानिर्मिती विरुध्द३५-२४ अशा ११ गुणांनी विजय संपादन केले आहे. तसेच इतर तीन संघासोबत अटीतटीच्या सामान्यात कमी अनुभवा अभावी विजय मिळू शकला नाही. या क्रिडा स्पर्धेसाठी संघाला श्री.अशोक साळुंखे व श्री.अरुण बेलगांवकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

सदर क्रिडा स्पर्धेचे समारोप व बक्षीस वितरण समारंभ दि. २९.०३.२०१४ रोजी मा.मुख्य सचिव, केरळ राज्य, केरळ विद्युत मंडळाचे संचालक मंडळ व अखिल भारतीय विद्युत क्रिडा नियंत्रण मंडळ अध्यक्ष जि.के. दहिया यांच्या उपस्थितीत पार पडले.

या क्रिडास्पर्धेत कमी कालावधीमध्ये चांगल्याप्रकारे सहभागाबद्दल मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, संचालक (प्रकल्प/संचलन) संचालक (वित्त), कार्यकारी संचालक (संचलन/मासं) व मुख्य औद्योगिक सं.अ. यांनी कौतुक केले तसेच पुढील वर्षीच्या क्रिडास्पर्धेसाठी जोरदार प्रयत्न करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## चंद्रपुर येथील HVDC Converter Transformer (298.6MVA) Oil ची कुलींग क्षमतेत वाढ



महापारेषण कंपनीच्या एचव्हीडीसी टर्मीनल स्टेशन, चंद्रपुर येथील एचव्हीडीसी कन्वर्टर ट्रान्सफार्मरच्या ऑइलचे तापमान उन्हाळ्यामध्ये अलार्मींग पॉईंट पर्यंत जात होते. सध्याच्या या अडचणी मुळे काही वेळा Power सुध्दा Back Down करावा लागला. सदर ट्रान्सफार्मरला OFAF (OIL Force Air Force) ही कुलींग सिस्टम लागलेली आहे. ट्रान्सफार्मर मधील १००KL Oil थंड करण्यासाठी १६ रेडियेटर आणि १६ पंखे लावलेले आहेत. परंतु उन्हाळ्याच्या दिवसामध्ये चंद्रपुर मधील वातावरण सुध्दा गरम असल्या कारणास्तव उपरोक्त कुलींग सुध्दा ऑइलला लवकर थंड करण्यास अपयशी ठरते.

सदर अडचणीवर मात करण्याकरीता बाहय कक्षाचे उप कार्यकारी अभियंता श्री.सुभाष कोट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सहकारी श्री.दिनेश पाल, सहाय्यक अभियंता आणि श्री.ए.एन.वांझाळ आणि श्री.डी.के.भांगे कारागीर 'अ' यांनी स्टोअर मध्ये उपलब्ध असलेल्या साधनाद्वारे स्प्रे पाइपलाईनचे डिझाइन केले व त्या पाईपलाईनचा चारही ट्रान्सफार्मरच्या प्रत्येकी वरच्या रेडियेटरला बसवून घेतले. चारही ट्रान्सफार्मरची स्प्रिंकलर पाईपलाईन डिझेल इंजीन द्वारे प्रेशराईज करून पाण्याचे रेडियेटरवर स्प्रे केले.

या स्प्रे पाईपलाईन द्वारे पाणी स्प्रे केले असता ऑइलचे आणि वाईडिंगचे तापमान जवळपास १०°C ने कमी झाले. सदर पाईपलाईन डिझाईन करताना वरील रेडियेटर वर पाण्याचा मारा करण्यात येतो आणि त्यानंतर खाली पडलेल्या पाण्याने खालील रेडीयेटर सुध्दा थंड होतात. स्प्रे होत असलेले पाणी जमा करून त्याला पुन्हा वापरण्याबद्दल प्रयत्न चालू आहेत.

या उपक्रमाला यशस्वी करण्याकरीता सदर चमुला श्री.सतिश अणे, अधीक्षक अभियंता व श्री.भारत बनसोड, आणि सुनिल सरडे कार्यकारी अभियंता यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## १ ३ २ केव्ही उपकेंद्र काटोल येथे कर्मचारी कल्याण योजनेतंर्गत आखलेले उपक्रम



अउदा बांध. नि. (संवसु) परिमंडळ नागपूर अंतर्गत असलेल्या १३२ केव्ही उपकेंद्र काटोल येथे कर्मचारी कल्याण योजने अंतर्गत नव्याने उभारण्यात आलेल्या बॅडमिंटन कोर्ट व महिला व पुरुष विश्रांती गृहाचे उद्घाटन या परिमंडळाचे मुख्य अभियंता मा.श्री. एल.एस. सोनकवडे यांच्या हस्ते दि. ०६.१२.२०१३ रोजी करण्यात आले. तसेच १३२केव्ही उपकेंद्राच्या परिसरात वृक्षारोपनाचा कार्यक्रम घेण्यात आला सदर कार्यक्रमाला मार्गदर्शन करताना श्री.एल.एस. सोनकवडे, मुख्य अभियंता यांनी आपल्या कंपनीच्या हिताकरीता व उपकेंद्राच्या देखभाली करीता सर्व कर्मचाऱ्यांनी/अधिकाऱ्यांनी आप आपले योगदान दिल्यास कंपनीची व आपली प्रगती होण्यास मदत होईल असे मोलाचे विचार व्यक्त केले. तसेच या उपकेंद्राचे नियंत्रण अधिकारी श्री.ए.एस. गाडीगोणे, सहा. अभियंता व सर्व कर्मचारी यांनी उपकेंद्रात अशा प्रकारचा कार्यक्रम आयोजीत केल्याबद्दल त्यांचे सुध्दा अभिनंदन केले. तसेच या कार्यक्रमात उपस्थित असलेले परिमंडळ मानव संसाधन विभागाचे प्रमुख श्री.ए.के. रोही, सहा. महाव्यवस्थापक (मासं) यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना मानव संसाधन विभागासंबंधी व कंपनीच्या हिताच्या भावी वाटचालीबाबत अनमोल असे आपले मार्गदर्शन केले. श्री.डी.टी.रूपराय, अधिकारी अभियंता, अउदा संवसु विभाग नागपूर यांनी आपले विचार व्यक्त करताना प्रत्येकांनी कंपनीच्या हिता करीता काम करावे असे मत मांडुन सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमाला श्री.आर.एस. परूळकर, कार्यकारी अभियंता, श्री.एम.एस. तट्टे कार्यकारी, अभियंता, श्री.कुमरे, उपव्यवस्थापक (मासं) तसेच मोठ्या प्रमाणात अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती
## माहे जानेवारी ते मार्च २०१४

**नियुक्ती-**

| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.विके जयंत देऊराव | मुख्य अभियंता (पारेषण) | पारेषण स.व.सु. सांघिक कार्यालय | ०१.०२.२०१४ |
| २. | श्री.संजय कुमार ले.कर्नल. (निवृत्त) | मुख्य सुरक्षा अधिकारी | सांघिक कार्यालय | १५.०२.२०१४ |
| ३. | श्री.काळे श्रीकांत सदाशिव | अधीक्षक अभियंता (पारेषण) | पारेषण प्रकल्प आणि अभिकल्प, सांघिक कार्यालय | ०१.०२.२०१४ |
| ४. | श्री.बल्लाळ भुषण हरिश | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | अ.ऊ.दा. बांधकाम नि.स.व.सु. परिमंडळ औरंगाबाद | ०१.०२.२०१४ |

**निवृत्ती-**

| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.झोडे मिलिंद पांडूरंग | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अतिउच्च दाब बांधकाम नि.स.व.सु. अमरावती | ३१.०१.२०१४ |
| २. | श्री.पाटिल विजय मारोतराव | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अतिउच्च दाब मंडळ पडघा | २८.०२.२०१४ |
| ३. | श्री.सहारे हिरालाल मुरलीधर | अधीक्षक अभियंता (पारेषण) | दूरसंचार विभाग, सांघिक कार्यालय, मुंबई | ३१.०३.२०१४ |

## परिमंडळ पातळीवरील बक्षीस योजने अंतर्गत निवड झालेल्या उपकेंद्र व कार्य विभागांना पुरस्कार वितरण सोहळा



डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह ठाणे येथे दि. १८.०३.२०१४ रोजी वाशी परिमंडळाचा उत्कृष्ट उपकेंद्राच्या बक्षीस वितरण समारंभ व कंपनीचा वर्धापनदिन समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन मा.श्री.बिपीन श्रीमाळी, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण, मुंबई यांचे हस्ते झाले. कार्यक्रमास मा.श्री.ओमप्रकाश एम्पाल, संचालक (संचलन) तसेच, श्री.सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (मासं/संचलन), महापारेषण, मुंबई तसेच श्री.अनंत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.श्री.विकास बढे, मुख्य अभियंता, वाशी परिमंडळ यांनी केले.

खालील प्रमाणे उपकेंद्राना वर्ष - २०१२-२०१३ साठी वाशी परिमंडळस्तरावरील उत्कृष्ट उपकेंद्र पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ देऊन सन्मानीत करण्यात आले.

| अ. क्र. | उपकेंद्राची नांवे | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | १३२ केव्ही व त्या खालील उपकेंद्र | १०० केव्ही उपकेंद्र वाशी | १०० केव्ही उपकेंद्र डोंबिवली |
| २ | २२० केव्ही उपकेंद्र | २२० केव्ही नेरूळ उपकेंद्र | २२० केव्ही उपकेंद्र वशाळा |
| ३ | लाईन मेंटेनन्स उपविभाग | २२० केव्ही लाईन मेंटेनन्स उपविभाग, कळवा | उदादिधा वाहिनी उभारणी उपविभाग, बाभळेश्वर |
| ४ | हॉट लाईन मेंटेनन्स उपविभाग/युनिट | हॉट लाईन मेंटेनन्स युनिट, कळवा | हॉट लाईन मेंटेनन्स युनिट, खारघर |

सदर कार्यक्रमास वाशी परिमंडळातील बहुसंख्य कर्मचारी/अधिकारी त्यांचे कुटुंबिय तसेच सांघिक कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. विभावरी सावंत यांनी केले. आभार प्रदर्शन श्री.प्रकाश कुलकर्णी, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) यांनी केले.

## नागपूर परिमंडळा तर्फे जागतिक महिला दिन साजरा




महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित परिमंडळ कार्यालय नागपूर तर्फे जागतिक महिला दिनानिमित्त दि. २१ मार्च २०१४ रोजी महिला कर्मचाऱ्यांसाठी कार्यक्रम विशेष अतिथी गृह, बिजली नगर नागपूर येथे आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्य अतिथी म्हणून डॉ.निलीमा देशमुख, संचालक, महिला अध्ययन केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षपद श्री.एल.एस. सोनकवडे, मुख्य अभियंता यांनी भुषविले. विशेष अतिथी म्हणून कवियत्री सौ.स्वाती सुरंगळीकर उपस्थित होत्या. त्यांनी काव्य सादरीकरणाचा ''दिलखुलास'' कार्यक्रम सादर केला. सौ. किशोरी मित्रा, कार्यकारी अभियंता या सुध्दा मंचकावर उपस्थित होत्या. सदर कार्यक्रमास जवळपास १०० महिलांचा उत्सफुर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमात महिलांशी निगडीत समस्यांची चर्चा करून त्यांचे मनोबल वाढविण्याच्या दृष्टिकोनातून विचार मंथन करण्यात आले.

सदर कार्यक्रमामुळे परिमंडळातील सहभागी झालेल्या अधिकारी /कर्मचारी महिलांचे मनोबल उंचाविण्यास हातभार लागला. सर्वांना महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### Admin Circular No. ३९४ बाबत

Admin Circular 394 Dtd. 07.02.2014 अन्वये व्यवस्थापनाने कार्य मुल्यांकन पद्धतीमध्ये गरजेनुसार बदल केला आहे.

तद्नुसार आता Performance Year 2014-2015 पासुन Outstanding Rating करीता Justification Note ची प्रावधान करण्यात आलेली आहे.

तसेच Performance Year 2013-2014 पासुन "Behavioural Competency" चे मुल्यांकन जे पूर्वी CSO Level पर्यंत होते ते आता Accepting Level पर्यंत करण्यात आलेले आहे.

तसेच वित्तीय वर्ष २०१४-२०१५ पासुन कार्यमुल्यांकन पध्दती ERP (SAP) च्या माध्यमातुन On-Line करण्यात येईल.

ह्या संदर्भात विस्तृत माहिती करीता Admn. Circular ३९४ चे वाचन करावे. कंपनीच्या कर्मचारी संकेत स्थळावर ते उपलब्ध आहे.

### सांघीक कार्यालयातर्फे "Leadership Masterclass" प्रशिक्षण कार्यक्रमाचे पडघे येथे आयोजन



मुख्य अभियंता व विभाग प्रमुख यांच्या करीता यशस्वीरीत्या राबविलेल्या "Leadership Masterclass" चे प्रशिक्षण सांघीक कार्यालयाने अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता व तत्सम अधिकारी यांच्या करीता पडघे येथे आयोजित केले.

हया दोन दिवसीय कार्यक्रमात विजक्षेत्रातील स्पर्धा व तदनुसार आपल्या कार्यपध्दतीत बदल, नविन कार्यमुल्यांकन पध्दती व निर्णय घटक असणाऱ्या अधिकाऱ्यांची भुमिका या बद्दल उहापोह केला.

अशाप्रकारच्या कार्यक्रमामुळे विचारसरणी मध्ये आवश्यक बदल झाला अशी अभिव्यक्ती सहभागी झालेल्या अधिकाऱ्यांनी दिली.

### भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२३व्या जयंती निमित्त हार्दिक शुभेच्छा



सामाजिक न्याय, समता, बंधुता भारत देशात रूजविण्या करीता अथक परिश्रम करणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रील रोजी १२३व्या जयंती बद्दल त्यांच्या स्मृतीस नम्र अभिवादन.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मरण करताना त्यांच्या दोन प्रमुख योगदानाची नेहमीच आठवण होते. प्रथम म्हणजे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांनी दिलेले योगदान आणि समाजातील दुर्बल घटकांच्या विकासासाठी त्यांनी केलेली शर्थ.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तीन शब्दात डॉ.आंबेडकरांचे तत्व सामावलेले आहे. बंधुता आणि मानवता हेच धर्माचे दुसरे नाव आहे, अशी त्यांची धारणा होती. आज सामाजिक विषमता भारत देशातुन कमी होण्यास त्यांच्या नेतृत्वाचा मोठा हातभार आहे.

विधी, कायदा, वित्त, अर्थ, कामगार, मानवी हक्क, सामाजिक, धार्मिक अशा अनेक विषयांवर लौकीक गाजविणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा सर्वांना अभिमान आहे व त्यांच्या जयंती निमित्त त्यांच्या स्मृतीस त्रिवार अभिवादन.

**-सांघिक सुसंवाद विभाग**

### महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी सहकारी पतसंस्थेला ''उत्कृष्ठ पगारदार पतसंस्था पुरस्कार'' व प्रतिबिंब वार्षिक अहवाल स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक



मुंबई कोकण विभागीय पगारदार सहकारी पतसंस्था महासंघ, मुंबई यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेत म.रा.वि. मंडळ कर्मचारी सहकारी पतसंस्थेला ''उत्कृष्ठ पगारदार पतसंस्था पुरस्कार'' प्रदान करण्यात आला. मुंबई बँकेचे जेष्ठ संचालक मा.श्री.शिवाजीराव नलावडे व इतर मान्यवरांच्या हस्ते मुंबई येथे एका शानदार कार्यक्रमात स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष श्री.दत्तात्रय कुलकर्णी, मानद सचिव श्री.अशोक साळुंखे व संचालिका सौ.उमा धाटावकर यांनी पुरस्कार स्विकारला.

तसेच सहकार सुगंध आयोजित प्रतिबिंब या राज्यव्यापी वार्षिक अहवाल स्पर्धेत मुंबई (पतसंस्था) विभागातून आपल्या पतसंथेला ''उत्तेजनार्थ पुरस्कार'' देण्यात आला. स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुणे येथे झालेल्या समारंभामध्ये सदर पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष श्री.दत्तात्रय कुलकर्णी, उपाध्यक्ष श्री.अरविंद मुजूमदार व खजिनदार श्री.भारतभूषण बेलवलकर यांनी स्विकारला.

### ८ मार्च, जागतीक महिला दिना बाबत

देशाचा विकास त्या देशातील महिलांच्या विकासावरून ठरविण्यात येतो. आज अनेक ठिकाणी महिलांचे प्रतिनिधीत्व आपल्याला पाहायला मिळते. मात्र अजुनही बरीच मोठी कामगिरी महिला विकासाकरीता या देशात करणे गरजेचे आहे.

विशेषतः ग्रामीण भागात तसेच दारीद्ररेषेखालील कुटुंबातील महिलां करीता विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

महिलांचे शोषण होणार नाही तसेच त्यांच्या सबळीकरण व सक्षमी करणाकरीता विशेष कार्यक्रम हाती घेतले पाहिजे. समाजाचा केंद्र बिन्दु महिला आहे. संस्कृती जोपासण्याचे महान कार्य महिला करीत असते.

महापारेषण कंपनी महिला विकासाकरिता सतत प्रयत्नशील असते, व अभिनव कार्यक्रमाचे आयोजन करते. सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा!

**-सांघिक सुसंवाद विभाग**

## अमरावती व नागपूर परिमंडला Openhouse सभेचे आयोजन



**अमरावती**, अउदा बांधकाम नि. संवसु परिमंडळ, म.रा. विद्युत पारेषण कं. अमरावती तर्फे अउदा बांधकाम नि. संवसू परिमंडळांतर्गत असलेले अधिकारी व अभियंते यांची KRA/KPI Implementation & Employee Engagement Survey या विषयावर कार्यशाळा दिनांक ११.०३.२०१४ रोजी संपन्न झाली.

या कार्यशाळेत (Workshop) मार्गदर्शना करीता म.रा. विद्युत पारेषण कं. सांघिक कार्यालय मुंबईचे वरिष्ठ अधिकारी श्री.केळकर कार्यकारी संचालक (संचलन)/प्रभारी कार्यकारी संचालक (मासं), श्री.शिंदे मुख्य अभियंता (मासंवि) व श्री.सुगत गमरे महाव्यवस्थापक (मासं) हे उपस्थित होते तसेच या कार्यशाळेत अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री.बि.टी. राऊत, श्री.हिरामण राठोड सहा. महाव्यवस्थापक (मासं) व अधिकारी/ अभियंते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर प्रसंगी KRA/KPI बाबत श्री.सुगत गमरे महाव्यवस्थापक (मासं-तां) यांनी मार्गदर्शन केले व काही अभियंत्यांनी उपस्थित केलेल्या शंकाबाबत कार्यकारी संचालक श्री. केळकर साहेब व मुख्य अभियंता श्री.शिंदे साहेब यांनी निरसन केले सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

---

**नागपूर**, महापारेषण कंपनीतील वेतनगट १ व २ मध्ये कार्यरत सर्व अधिकाऱ्यांकरिता वर्ष २०११-२०१२ पासुन पुर्वीची गोपनिय अहवाल पध्दत बंद करून New Performance Appraisal System अमलात आलेली आहे. ही पध्दत अधिक प्रभावीपणे अमलात आणण्याकरीता सांघिक कार्यालय, मुंबई तर्फे अउदा बांधकाम नि. संवसु परिमंडळ अंतर्गत बिजली नगर गेस्ट हाऊस, नागपूर येथे दि. १०.०३.२०१४ रोजी अर्धदिवस कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

मुख्य अभियंता श्री.लक्ष्मीदास सोनकवडे, अउदा बांधकाम नि. संवसु परिमंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली, श्री.एस.जी. केळकर, कार्यकारी संचालक (मासं) व श्री.एस.टी. शिंदे, मुख्य अभियंता (मासंवि) तसेच श्री.सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मासं-तां) सांघिक कार्यालय, मुंबई यांनी Performance Appraisal system अधिक प्रभावीपणे कशी अमलात आणावी याबद्दल अमुल्य मार्गदर्शन केले. तसेच सन २०१४-२०१५ या वर्षाकरीता आपले ध्येय (Targets) निश्चित करून सन २०१३-२०१४ चे Performance Appraisal System भरून देवुन सदर पध्दत त्वरीत प्रभावीपणे अमलात आणावी अशी सुचना त्यांच्या कडून देण्यात आली. सदर कार्यशाळेत कार्यकारी अभियंता व तत्सम तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कार्यशाळेत सहभागी झालेल्या अधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे समाधानकारक निरसन करण्यात आले.

शेवटी, श्री.लक्ष्मीदास सोनकवडे, मुख्य अभियंता व श्री.अभय रोही, सहा. महाव्यवस्थापक (मासं) यांनी श्री.एस.जी. केळकर, कार्यकारी अधिकारी संचालक (मासं), श्री.शिंदे, मुख्य अभियंता (मासंवि) व श्री.सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मासं-तां) यांनी दिलेल्या अमुल्य मार्गदर्शनाबद्दल त्यांचे आभार मानले व कार्यक्रमाची यशस्वीरित्या सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमामुळे सर्व अधिकारी वर्गात उत्स्फुर्तीचे वातावरण निर्माण झालेले असुन Performance Appraisal System अधिक प्रभावीपणे आणण्याकरीता सर्वांचे मनोबल वाढले.

## महापारेषण कंपनीचा "Good to great" प्रवासाचा शुभारंभ

सांघिक कार्यालयातर्फे Employee Engagement Survey तसेच Exposure Visit to M/s Powergrid Corporation, New Delhi यांच्या संदर्भीय आठ निवडक समीत्यांचे गठण करण्यात आलेले आहे.

या आठ समित्या त्यांच्या क्षेत्रात निपुणता आणण्याकरीता त्यांच्या पातळीवर विचार विनिमय करूण त्याचा नियोजन आराखडा व्यवस्थापनाला सादर करणार आहेत.

गठीत केलेल्या समित्या खालील प्रमाणे आहेत.

**1.** Operations & Maintenance. **2.** Cost Engineering. **3.** Trans Lines & Sub/Station. **4.** Grid Management. **5.** QA & Inspection System. **6.** HVDC & G/S / Hybrid. **7.** Smart Grid. **8.** HRD.

या समित्या त्यांच्या क्षेत्रात Excellance आणण्याकरीता प्रयत्नशील राहतील व त्याकरीता इतर ज्या Best Practices आहेत त्या महापारेषण मध्ये कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करतील.

अशामुळे Organisation Transformation ला चालना मिळून महापारेषण कंपनीला Good to Great चा प्रवास करण्यास मदत होईल.

## मुख्य कार्यालयात मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.बीपीन श्रीमाळी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२३वी जयंती १४ एप्रिल रोजी साजरी



सालाबादप्रमाणे हया वर्षी सुध्दा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात मुख्य कार्यालयात अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.बीपीन श्रीमाळी यांच्या अध्यक्षेतेखाली साजरी करण्यात आली.

हया कार्यक्रमास, संचालक (प्रकल्प/संचलन) श्री.एम्पाल साहेब कार्यकारी संचालक (संचलन/मांस.) श्री.केळकर साहेब इतर वरिष्ठ अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमात अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व कार्यक्रमाचे अध्यक्ष, श्री.बीपीन श्रीमाळी यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याची माहीती सर्वांना दिली. त्यांनी त्यांच्या भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य फक्त महाराष्ट्राकरीता नसुन ते संपूर्ण देशासाठी, विश्वासाठी तसेच मानवतेकरीता असलेले महान कार्य आहे म्हणूनच त्यांची जयंती संपूर्ण विश्वात एका सणाप्रमाणे मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. भारताच्या संविधान निर्मितीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. संविधानामुळेच देशात लोकशाही व सर्वसामान्यांची प्रगती झाली, असे नमूद केले.

मा.अध्यक्षानी महामानवास अभिवादन करून भारतरत्न डॉ.आंबेडकरांनी दिलेल्या तत्वांना आचरणात आणून देशाची अधिक प्रगती करावी असे नमुद केले. सर्वांना जयंती निमित्त त्यांनी शुभेच्छा दिल्या व स्मरणांजली वाहीली.

## ART OF CARING

Humans are blessed by the nature with an ability to express. So we stand apart from other living things created by nature. Other living things may have feeling, emotions and ability to communicate but humans are distinct.

This special ability if used properly life becomes pleasurable and in true sense a paradise on the earth. Such ability connects you with rest of the world effectively. Individual is at centre and others who interact revolves around. So whoever revolves around must feel good about being with you. They should love to be in your circle.

It is a law of nature whatever we do it comes back to us. We need not to look for it. Doing good means caring. It is not only for living but also for non-living things. There is huge strength in caring. It has love, dignity, bonding, belongingness, respect, responsibility, etc.




There is no need to take hard effort for caring, infact it is to be done effortlessly. Like bird sings, fish swims, it should become way of life. Just imagine if we all become caring will this world not become loveliest place to stay.

I am disturbed when someone becomes unpleasant with dealing with others. I care, should become a campaign. It is not difficult thing, just be proactive, understanding and listening. It will help you to be caring.

Mother Nature will thank us if we all become caring. Today's challenging world our life become hectic and we tend to lose balance between work and life. If caring become way of life any challenge can be faced. We also get to know that as such there is no need to balance between work and life, infact both are together. Our work is life and life is work. One feels homely at work. At home you feel like devoting time for work. There your work becomes a mission and no negative thought comes in our mind.

Being Human, we must learn to be caring, not only with our family but with rest of world. I CARE, Do you?

**From the Desk of ED, HR**


**संपादक : श्री.संदीप सुरवसे, व्यवस्थापक (मा.सं.), प्रभारी जनसंपर्क अधिकारी**
**E-mail : prohr@mahatransco.in**
**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO **For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.


The Company accepts no responsibility for the matter published in the journal.